अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेकार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ४००८/२०१८१२ 
दिनांक :- २८/८/१९

माहिती अधिकार

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
अपिल क्र. अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय/पुणे मनपा/अपिल/१७३० दिनांक ३०/०५/२०१९.

१) अपिलकर्ता श्री प्रताप रामचंद्र जगताप
रा – २४२/अ+ब, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

२) जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय,
पुणे महानगरपालिका

श्री प्रताप रामचंद्र जगताप अपिलार्थी
विरुध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे मनपा.

माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(१) अन्वये सुनावणी दि. २०/०८/२०१९

अपिलकर्ता श्री प्रताप रामचंद्र जगताप यांचा इकडील कार्यालयाकडील आ.क्र ३०६ दिनांक ११/०४/२०१९ अन्वये माहिती अधिकारातील अर्ज प्राप्त झाला आहे. अपिलकर्ता श्री प्रताप रामचंद्र जगताप यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांचेकडे पुणे महानगरपालिका, (प्र.क्र.१४) वॉर्डस्तरीय अभियंतासाठी माननीय/माननियांसाठी (स्वेच्छेसाठी) खर्चासाठी देण्यात येणारी रक्कम व तिचा केलेला / उर्वरीत रक्कमेविषयी, निधीविषयी माहिती मिळणेसाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये अर्ज सादर केला आहे.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे मनपा यांनी अपिलकर्ता यांस त्यांनी मागणी केलेली माहिती इकडील कार्यालयाकडे बोटखतावर उपलब्ध असून सदरची मागणी केलेली माहिती कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध करून देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबधिची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ११/०४/२०१९ | १०/०५/२०१९ | जा.क्र.जीडब्ल्युओ/४८१ दि.०२/०५/२०१९ ने उत्तर कळविले. | निरंक | ०२/०५/२०१९ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे :- माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती प्रलंबित असल्याने सदरचे अपिल दाखल करण्यात आले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २४/०६/२०१९ | ३०/०५/२०१९ | होय | निरंक | जा.क्र. १४०३ दि.०६/०६/२०१९<br>जा.क्र. ३३०६ दि.०५/०८/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २०/०८/२०१९ वेळ दुपारी १२.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिका-याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिका, (प्र.क्र.१४) वॉर्डस्तरीय अभियांनासाठी माननीय/माननियांसाठी (स्वेच्छेसाठी) खर्चासाठी देण्यात येणारी रक्कम व तिचा केलेला / उर्वरीत रक्कमेविषयी, निधीविषयी माहिती मिळणेबाबत. | जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांस त्यानी मागणी केलेली माहिती इकडील कार्यालयाकडे बोटखतावर उपलब्ध असून सदरची मागणी केलेली माहिती कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध करून देण्यात येईल |

सदरची माहिती अपिलकर्ता यांस उपलब्ध झाली नसल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -आदेश-

प्रस्तुत प्रकरणी सदरचे अपिल अंशतः मान्य करण्यात येते, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी आ.क्र.३०६ दि.११/०४/२०१९ चे अर्जात नमूद केलेली इकडील कार्यालयाकडे उपलब्ध माहिती सदर आदेशाचे दिनांकापासून सात दिवसात देण्यात यावी.

उपरोक्त सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला असून सदर अपिल निकालात काढण्यात येत आहे.

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

27/8/19

(किशोर शिंदे)<br>
अपिल प्राधिकारी *तथा*<br>
महापालिका सहाय्यक आयुक्त<br>
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय<br>
पुणे महानगरपालिका